स्वयंरोजगारासाठी

# अर्धबंदिस्त शेळीपालन



## कृषि विज्ञान केंद्र

मराठवाडा शेती सहाय्य मंडळ, खरपुडी, जालना

केव्हीके/जालना-१/पुस्तिका/०४/२०२४




स्वयंरोजगारासाठी

# अर्धबंदिस्त शेळीपालन





लेखक

डॉ. हनुमंत मो. आगे
डॉ. श्रीकृष्ण व्ही. सोनुने



प्रकाशक

कृषि विज्ञान केंद्र
मराठवाडा शेती सहाय्य मंडळ
खरपुडी, जालना - ४३१ २०३
(महाराष्ट्र)
Email : pckvkjalna@gmail.com
Web : www.kvkjalna.org.in



प्रति : १०००

# अर्धबंदिस्त शेळीपालनाचे महत्व व गरज

ग्रामीण भागातील आजच्या परिस्थितीला समोर जाण्यासाठी व वातावरण बदलामध्ये शेतीमधील शाश्वत उत्पन्नासाठी, शेतकऱ्यांकडे शेतीपूरक व्यवसाय उभा असणे अत्यंत गरजेच आहे. आज ग्रामीण भागात प्रकर्षाणे एक महत्वाचा बदल दिसत आहे, तो असा की, शेतकऱ्यांच्या अनेक पिढ्या शेतीवरती अवलंबून असल्याने, हा सामाजिक बदल दिसत आहे, त्यामध्ये आजोबाला जेवढी शेती कसण्यास उपलब्ध होती, त्याच्या तीनपट कमी शेती त्याच्या नातवाला आज उपलब्ध आहे. एवढ्याच धारण क्षेत्रात शेतकऱ्याला त्याचे अर्थचक्र चालवावे लागते. यामध्ये वातावरण बदल, दुष्काळ, अनियमित पाऊस व तसेच गारपीट सारखे संकटे त्याच्या समोर तोंड 'आ' करून उभी आहेत. या परिस्थितीत दरवर्षी पीक उत्पादन मिळवण्यासाठी शेतकरी अपार कष्ट शेतीमध्ये करतांना दिसत आहे. त्याचा पिकावरील खर्च दरवर्षी वाढतांना दिसत आहे. त्यामुळे उपलब्ध साधानांमध्ये शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे दिवसेंदिवस कठीण होत आहे. मातीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण दिवसेंदिवस खालावत आहे, यासाठी शेतीतील उपलब्ध साधनसामग्रीचा ऊपयोग करून शेळीपालन व्यवसायाची शेतीला जोड देणे आवश्यक आहे.

शेळीपालनामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न शाश्वतीने वाढू शकते तसेच शेतातील पिकांना लेंडीखत उपलब्ध झाल्याने रासायनिक खतांचा खर्च कमी होऊन मातीचा सेंद्रिय कर्ब सुधारून उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते. शेळीपालन हा ग्रामीण भागात सहज व कमी खर्चात सुरू करण्याजोगा शेतीपूरक व्यवसाय आहे कारण या व्यवसायास लागणाऱ्या निविष्ठा शेतकरी आपल्या शेतात सहज निर्माण करू शकतो. या व्यवसाया करीता कुठलाही चारा विकत न घेता शेतकरी शेतात निर्माण करू शकतो म्हणून आपण जाणतो की ज्या व्यवसायामध्ये खर्च कमी असतो त्या व्यवसायामध्ये नफा अधिक मिळवणे सोपे असते. आज रोजी जालना जिल्ह्यामध्ये अनेक शेळीपालक तयार झालेले असून ते हमखास शेतीमधून व शेळीपालनातून उत्पन्न घेतांना दिसत आहे. जालना जिल्ह्यामध्ये शेळ्यांची संख्या या दशकामध्ये दुप्पटीपेक्षा जास्त वाढली आहे, हे आपणास मागील दोन पशुगणनेमधे दिसले आहे.

## हा व्यवसाय निवडण्याची ठळक कारणे :

१. सतत संकटात असणाऱ्या शेतकऱ्यांना शेतीस एक उत्तम जोडधंदा.
२. या व्यवसायामध्ये आर्थिक उत्पन्नाची (योग्य नियोजनामुळे) हमी.
३. शेतीला उत्कृष्ट सेंद्रिय खत मिळण्यासाठी.
४. दैनंदिन व शेती खर्चासाठी स्वत:च्या हातातील एक सोपा स्त्रोत.
५. कमी भांडवलात सुरू करता येणारा व्यवसाय.

६. लेकरं व वयोवृध्द यांच्या आरोग्यदायी दुधासाठी.
७. दुष्काळ परिस्थितीत शेतीला उत्तम पर्याय.
८. वाढती मागणी व चांगला कायम विक्री दर.
९. कमी व्यवस्थापन खर्च
१०. दोन शेळ्यांचे वार्षिक उत्पन्न एक एकर कोरडवाहू शेतीपेक्षा अधिक आहे. (अंदाजे रू. ४००००/-)
११. शेळीच्या आयुष्यभरात म्हणजे बारा वर्षात दोन लाख रू. उत्पन्न देण्याचे सामर्थ्य आहे.
१२. सात वर्षे एका शेळीचा सांभाळ करून तिच्या पोटी जन्मणाऱ्या पाठींचा सांभाळ करून ५०० शेळ्यांचा फार्म तयार करता येतो व या सात वर्षात किमान ४० लाख रू. उत्पन्न मिळू शकते.

## यशस्वी शेळीपालन व्यवसाया करीता आवश्यक बाबी :

१. शेळीपालन व्यवसाया करीता आवश्यक लागणारे कौशल्य व व्यवसायाची इत्यंभूत शास्त्रीय माहिती आत्मसात करणे गरजेचे आहे.
२. या करीता प्रशिक्षण घ्यावे.
३. हा व्यवसाय नव्याने सुरू करीत असाल तर एकदम १०० ते २०० शेळ्यांचा न करता २५ शेळ्या व १ नर असा छोटा व्यवसाय सुरू करावा.
४. आहारावरील खर्च कमी करण्यासाठी शेळीपालना करीता सहज व सोप्या पध्दतीने शेतातील बांधावर, ओढ्याच्या काठी किंवा पडीत जमिनीवरती झाडपाला लागवड करावी.
५. हा व्यवसाय स्वबळावर करण्याचा प्रयत्न करावा, सावकारी कर्ज काढून एकदम खर्चिक मोठा व्यवसाय करू नये.
६. शेळीपालन सुरू करण्यापूर्वी शेतात शेळ्यांच्या चाऱ्यांची लागवड सहा महिने अगोदर करावी.
७. साधारणपणे २५+१ शेळ्यांना एक एकर चारा लागवड करणे आवश्यक आहे.
८. शेळीपालन यशस्वी करण्यासाठी चांगल्या निरोगी शेळ्यांची निवड करा.
९. शेळीपालन सुरू करण्याअगोदर शेळ्यांच्या निवाऱ्यासाठी साधा गोठा बांधावा.
१०. शेळ्यांना जंतनिर्मुलनाचे व लसीचे औषध वेळोवेळी द्या.
११. नवजात करडांची विशेष काळजी घ्या, व्याल्यानंतर लगेच कोवळे दुध लवकर पाजा व १४ दिवसानंतर जंतनाशक औषध आवश्य पाजा.
१२. शेळ्यांचा गोठा स्वच्छ ठेवावा व त्यांना स्वच्छ पाणी पाजावे.
१३. शेळ्यांना पशुवैद्यकाच्या सल्ल्याने जंतनाशक वेळोवेळी पाजावेत.
१४. बाह्यपरोपजीवीपासून शेळ्याचे संरक्षण करण्यासाठी गोठ्यात अंघोळ हौद

बांधावा. यामध्ये योग्य प्रमाणात परोपजीवी नाशक औषधांचा वापर करावा.

१५. हिवाळ्यामध्ये थंडीपासून संरक्षण होण्यासाठी गोठ्यात २०० वॅटचा एक विद्युत बल्ब प्रत्येक दहा शेळ्यांसाठी लावावा.

१६. उन्हापासून शेळ्यांचे उन्हाळ्यात संरक्षण करण्यासाठी सावलीची सोय करावी.

१७. नवीन जनलेल्या शेळ्यांना गोठ्यातच तीन ते चार दिवस पिल्लांसोबत ठेऊन चारा पाणी द्यावे.

१८. शक्यतो रात्री बोकडांना शेळ्यांपासून वेगळे गोठ्यातच ठेवावे.

१९. वेळोवेळी लसीकरण करून शेळ्यांचे आरोग्य जपावे.

२०. लागवडीचा बोकड कळपामध्ये त्याच्यापासून जन्मणाऱ्या शेळ्यांना वापरू नये व दर दोन वर्षांनी कळपातील बोकड बदलावा.

## शेळीपालनमधील अर्थशास्त्र :

साधारपणे एक ऊस्मानाबादी शेळी एका वर्षात दोनवेळा पिलांना जन्म देते. या शेळ्यांमध्ये एकाचवेळी दोन ते तीन पिल्ल देण्याचे प्रमाण जास्त आहे. अशा एकूण १०० शेळ्या पाळल्यास वर्षाकाठी आपणास कमीतकमी ३०० ते ४०० पिल्लं मिळतात. ज्यांची किंमत २५ ते ३० लाख रूपये होते. यामध्ये ६०% खर्च वजा करून महिना एक ते दीड लाख उत्पन्न मिळण्याचे सामर्थ्य या शेळीपालन व्यवसायामध्ये आहे. म्हणून शेतकऱ्यांनी शाश्वत उत्पन्ना करीता शेतीला शेळीपालन हा जोड व्यवसाय करण्याची गरज आहे.

## एक एकर शेळीपालनाचे गणित :

एक एकर शेळीपालनाचे गणित यशस्वी करण्यासाठी एक एकर चारा लागवड करणे अतिशय महत्वाचे आहे. यासाठी शेतकऱ्यांनी बांधावर, पडीत जमिनीवर, ओढा, डोंगर इत्यादी ठिकाणी शेळीला आवडणारी झाडपाला लागवड, त्यामध्ये सुबाभूळ, भोकर, तुती, अंजन, कांचन, हादगा, शेवगा, बोर, चिंच, पिंपळ इ. झाडे पुढीलप्रमाणे लावावी व झाड लावताना छोटी झाडे ५ बाय ५ (शेवरी सुबाभूळ, शेवगा) तुती ५ बाय ३, बोर, पिंपळ, अंजन, कांचन ही झाडे शेताच्या बांधावर दहा फुट अंतरावर लावावी. बांधावर झाडे लावल्यानंतर एक एकर शेतामध्ये ३० गुंठे वरती एकदल चारा व राहीलेले १० गुंठे क्षेत्रावर द्विदल चारा लागवड करावी. शेळ्यांकरीता एका गुंठ्यावर साधा गोठा सोबत २ गुंठ्यावर समोर अंगण ठेवावे व यामध्ये २५ मोठ्या शेळ्यांचे संगोपन सुरू

करावे. मोठ्या शेळ्या एकदम खरेदी न करता झाडपाला लागवड केल्यानंतर लगेच ५ मोठ्या शेळ्या खरेदी कराव्यात. त्या दोन वर्षात २५ शेळ्या होतात व २० बोकडे विक्री करता येतात. वर्षभरात या गणितातून आपणास कमित कमी ७० ते ८० शेळ्यांची पिल्लं मोठी करता येतात. ४ ते ५ महिने वयाची ही पिल्लं बाजारात विकल्यास ३.५ ते ४ लक्ष रूपये दरवर्षी मिळतात. यामधे खर्च वजा जाता २.५ ते ३ लाख रूपये निव्वळ नफा मिळतो.

## २५ + १ युनिट अर्थशास्त्र

| अ. क्र. | खर्च | संख्या | रूपये | उत्पन्न | संख्या | रूपये |
|---|---|---|---|---|---|---|
| **पहिले वर्ष** | | | | | | |
| १ | खरेदी रू. १००००/शेळी | २५ | २.५ लक्ष | करड विक्री रू. ५०००/नग | ८० | ४ लक्ष |
| | बोकड | १ | १० हजार | लेंडी खत ३०००/टन | १० | ३० हजार |
| २ | गोठा (साधा) | १ | १ लक्ष | | | |
| ३ | खुराक (१८० दिवस) | --- | २० हजार | | | |
| ४ | विमा | २६ | १३ हजार | | | |
| ५ | औषधी | २६ | १० हजार | | | |
| ६ | पाणी, विज | --- | १० हजार | | | |
| ७ | मजुरी | --- | ८० हजार | | | |
| ८ | इतर | --- | ७ हजार | | | |
| | एकूण | --- | ५ लक्ष | एकूण | --- | ४.३ लक्ष |
| **दुसरे वर्ष** | | | | | | |
| १ | खुराक (१८० दिवस) | --- | २० हजार | करड विक्री रू. ५०००/नग | ८० | ४ लक्ष |
| २ | विमा | २६ | १३ हजार | | | |
| ३ | औषधी | २६ | १० हजार | लेंडी खत ३०००/टन | १० | ३० हजार |
| ४ | पाणी, विज | --- | १० हजार | | | |
| ५ | मजुरी | --- | ८० हजार | | | |
| ६ | इतर | --- | ७ हजार | | | |
| | एकूण | --- | १.४ लक्ष | एकूण | --- | ४.३ लक्ष |

* यापुढे दरवर्षी हे अर्थशास्त्र कायम राहील.

## वार्षिक उत्पन्न माहिती तक्ता

| वर्ष | एकूण खर्च | एकूण उत्पन्न | निव्वळ नफा | प्रति माह उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| पहिले | ५ लक्ष | ४.३ लक्ष | – ०.७ लक्ष | --- |
| दुसरे | १.४ लक्ष | ४.३ लक्ष | २.९ लक्ष | २४,१६७ |
| तीसरे | १.४ लक्ष | ४.३ लक्ष | २.९ लक्ष | २४,१६७ |

* यापुढे दरवर्षी हे उत्पन्न कायम राहील.

## अर्धबंदिस्त शेळीपालन म्हणजे काय ?

पारंपारिक शेळी पालन पध्दतीमध्ये अनेक तोटे असून शेळीपालकाचे पावसाळ्यामध्ये होणारे नुकसान टाळण्यासाठी शेळीपालकांनी अर्धबंदिस्त शेळीपालन पध्दतीचा अवलंब करावा. या पध्दतीत शेळ्यांना कायम निवाऱ्याच्या ठिकाणीच म्हणजेच गोठ्याच्या ठिकाणी चारा, पाणी व फिरण्याची सोय कायम करणे म्हणजे अर्धबंदिस्त शेळीपालन होय.



**गोठा (बंदिस्त) + मोकळे मैदान = अर्धबंदिस्त शेळीपालन**

## शेळ्यांकरीता गोठा बांधणी व जागेची निवड :

शेळ्यांकरीता गोठा बांधणी ही शास्त्रीय पध्दतीने करण्याची गरज असते. उथळ, पाणी न साचणारी जागा गोठ्यासाठी निवडावी, गोठ्याची लांबी पूर्व व पश्चिम दिशेमध्येच बांधावी. थंडी, वारा, ऊन, गारा व पाऊस इत्यादींपासून शेळ्यांना संरक्षण देणारा सक्षम गोठा बांधावा. मोठ्या शेळ्यांना गोठ्यात प्रत्येकी १२ ते १५ चौ.फुट जागा व याच्या दुप्पट जागा मोकळ्या मैदानात उपलब्ध करावी. सोबत लहान पिल्लांना २ ते ४ चौ.फुट प्रति पिल्लू जागा द्यावी. गोठ्यामध्ये खाद्य, पाणी व रात्री प्रकाशाची सोय असावी. गोठ्यात आजारी शेळ्यांना, पिल्लांना व गाभन शेळ्यांना वेगळी जागा ठेवावी. गोठ्याच्या बाजूलाच शेळ्यांना वाहनातून उतरवण्यासाठी व चढवण्यासाठी उताराचा धक्का बांधावा. गोठ्याच्या चारशे मीटर दूर जागा असल्यास मृत्यू पावलेल्या शेळ्यांसाठी शवविच्छेदन करण्याची सोय असावी. सुरूवातीला जास्त भांडवल गोठ्यावरती खर्च न करता साधा गोठा शेळ्यांना बांधावा व यामधून उत्पन्न मिळाल्यानंतर आपल्या हौसे प्रमाणे गोठा बांधावा.

## गोठ्याची जागा निवडतांना खालील बाबी महत्वाच्या ठरतात :

१. अर्धबंदिस्त शेळीपालन पध्दतीचा अवलंब करावा.
२. जंगली प्राणी व दलदलीपासून दूर असणारी जागा गोठ्यासाठी निवडावी.
३. उंचवटा असणारी व पाणी न साचणारी जागा निवडावी.
४. पावसापासून संरक्षण होण्यासाठी गोठ्याची उंची १० ते १२ फुट ठेवावी.
५. साधारणपणे १०० शेळ्यांना ५ गुंठे शेड व १० गुंठे मोकळे आंगण ठेवावे.
६. शेडमध्ये कमीत कमी ५ वेगवेगळे विभाग करावेत यामध्ये पिल्ल असणाऱ्या शेळ्या, गाभण शेळ्या, विक्रीचे बोकड व पाठी, लागवडीचे बोकड या विभागात संख्येनुसार ठेवावेत.
७. गाभण शेळी जनन्या करीता गाभण शेळीच्या विभागात ५० चौ.फुट कोबा केलेली जागा असावी याला शौषखड्याची जोड द्यावी.
८. शेडच्या समोरील रिकामी जागा मोकळे फिरण्यास उपलब्ध करावी.
९. आजारी शेळ्यांना शेडच्या दूर ५० फुट अंतरावर वेगळा विभाग असावा.





## शेळ्या खरेदी करण्याची वेळ :

गोठा व चाऱ्याची सोय केल्यानंतर हिवाळा किंवा उन्हाळ्यात शेळ्या खरेदी कराव्यात. पावसाळ्यामध्ये शेळ्या खरेदी करू नये कारण प्रवासामध्ये व वातावरणामुळे शेळ्या आजारी पडण्याचे प्रमाण अधिक असते. गाभण शेळ्यांना खूप दूरवर वाहनांने घेऊन जाणे टाळावे. प्रवासामुळे शेळ्या गाभडण्याचे प्रमाण जास्त वाढते. खरेदी बाजारातून न करता शेळीपालकांकडून दर्जेदार शेळ्यांची खरेदी करावी. शक्यतो जुळे व तीळे करडे देणाऱ्या शेळ्या खरेदी कराव्यात.

## चाऱ्याचे नियोजन :

एक एकर कोरडवाहू शेतीमध्ये २० ते २५ शेळ्यांचे अर्धबंदिस्त पध्दतीने यशस्वी पालन केले जाऊ शकते. शेतातील झाडपाल्याचे प्रमाण व शेळ्यांची संख्या यानुसार वार्षिक चाऱ्याचे नियोजन करणे अतिशय महत्वाचे ठरते. हिरवा चारा देण्यासाठी मका, बरसीम, लसून घास, चवळी, दिनानाथ गवत, निगीगवत, निल

गवत, स्टायलो, मारवेल यांचा वापर करावा. साधारणपणे एकाशेळीला दिवसभरात ५ किलो हिरवा व ३ किलो वाळलेला चारा द्यावा. जनलेल्या व ५ व्या महिन्यातील गाभणशेळ्या यांना दुध वाढण्यासाठी व पिल्लांची वाढ होण्यासाठी २५० ते ३०० ग्रॅम अतिरीक्त खुराक द्यावा. खुराकामध्ये खनिज मिश्रणाचा वापर आवश्य करावा. हिरव्या चाऱ्यामध्ये ५०% झाडपाल्याचे प्रमाण ठेवण्यासाठी शेतातील बांध, ओढा, नाला, नदी, रस्ता इ. च्या बाजूस बोर, सुबाभुळ, बाभुळ, शेवरी, शेवगा, हदगा, तुती, चिंच, पिंपळ, आपटा, सौंदड, या झाडांची लागवड केल्यास चारा नियोजन करणे सोपे जाते. एक एकर क्षेत्रात ७०% एकदल व ३०% क्षेत्रात द्विदल चारा पिके लावावीत.







## अर्धबंदिस्त शेळीपालनासाठी शेळ्यांची निवड :

महाराष्ट्रात निसर्गाशी जुळवून घेणाऱ्या शेळ्या, त्यामध्ये उस्मानाबादी, संगमनेरी, बेरारी व कोकणकन्याळ चांगल्या वाढतात. प्रामुख्याने शेळी पालन व्यवसाय मांस उत्पादनासाठी करत असल्याने शेळी निवडताना भारदस्त छांती, रूंद, उंच, लांब, सशक्त व निरोगी निवडावी. त्यांचे वय १ ते ३ वर्षे असावे. साधारणपणे जुळे करडे देणारी शेळी निवडावी. मराठवाड्यात उस्मानाबादी शेळीचे जुळे किंवा तिळे तसेच पाच पिल्लं देण्याचे देखील दाखले आहेत.

## दुध उत्पादनासाठी शेळ्यांची निवड :

जागतिक बाजारपेठेचा विचार करता शेळ्यांच्या दुधापासून बनवण्यात येणारा 'चिज' या पदार्थास प्रचंड मागणी आहे. दुध देणाऱ्या शेळ्या निवड करतांना खालील बाबी महत्वाच्या ठरतात.



१. शेळीची रूंद व मोठी कास असावी.
२. दोनही सड लांब व आकाराने सारखी असावी.
३. सडांना उपसड नसावेत.
४. कासेवरती फोड, व्रण, डाग नसावेत.
५. जातीवंत दुध देणाऱ्या शेळ्यांची निवड करावी.

## पैदाशीसाठी नराची निवड :

नर हा कळपातील सुदृढ व त्या त्या जातीचे गुणधर्म दर्शविणारा असावा. पैदाशीचा नर चपळ असावा. तो निवडतांना दोन जुळ्या नरातील एक चांगला नर निवडावा. हा नर दर दोन वर्षांनी कळपामध्ये बदलावा. अनेक वर्ष किंवा कळपातील नर नेहमी नेहमी निवडल्याने जन्मणारे पिल्लं कमजोर व आजारी निघतात. पैदाशीच्या नराची प्रजोत्पादन क्षमता चांगली असावी. पैदाशीचा नर उंच, लांब, भरदार छाती असणारा असावा तो जातिवंत माता-पित्यांपासून निर्माण झालेला असावा. हा नर एक ते दिड वर्षांचा असावा. नर हा शेळीपालनातील कळपाचा राजा असतो.



# शेळ्यांच्या विविध जाती

**उस्मानाबादी :** उस्मानाबाद, लातूर,
तुळजापूर व उदगीर भागात आढळते
वजन नर=४०-४५ किलो आणि
मादी =३५-४० किलो, रंग काळा
दुध व मांस उत्पादनासाठी प्रसिध्द.
जन्मदर : वर्षातून दोनदा,
जुळे किंवा तिळे पिल्लं देण्याचे प्रमाण अधिक




**संगमनेरी :**

पुणे, अहिल्यानगर या भागात आढळते
रंग - पांढरा, काळा किंवा तपकिरी
त्यावर ठिपके असतात
वजन नर ३८-४० किलो, मादी ३०-३५ किलो
जन्मदर : दोन वर्षात तीनवेळा
दुध व मांस दोन्हीसाठी उपयुक्त



## कोकण कन्याळ :



रायगड,रत्नागिरी व कोल्हापूर या भागात आढळते
वजन नर ४०-४५ किलो, मादी ३५-४० किलो
रंग - पायाच्या पाठीमागे व ओठी-पोटीला
करडा रंग, डोळ्यासोमर दोन करडे पट्टे,
कानाची कोर करड्यापट्ट्याची,
कान छोटे व पडलेले असतात.
मांस व दुध उत्पादनासाठी चांगली.
जन्मदर - वर्षात दोनवेळा
कृषि विद्यापीठ दापोली संशोधीत शेळी कोकणपट्या करीता शिफारस केलेली आहे.



**जमुनापारी :** उत्तर प्रदेशात गंगा, जमुना,
चंबाळ नदीचे खोरे या भागात आढळते.
सर्वात मोठी, दुध उत्पादनासाठी उपयोगी,
वजन नर ५० ते ६०, मादी ४० ते ५० किलो
रंग - पांढरा किंवा पिवळसर फिक्का त्यावर
करडे ठिपके, ठिपके मान व डोके यावर
जास्त असतात, रोमन नाक (पोपटासारखे)
मोठे कान इत्यादी वैशिष्टे आढळतात.
जन्मदर - वर्षात एकवेळा



**बिटल** - पंजाब, हरियाणा याभागात आढळते
रंग - काळा व रोमन नाक (पोपटासारखे), मोठे कान
वजन नर - ५० किलो, मादी - ४० किलो
जन्मदर - दोन वर्षात तीन वेळा
दुध व मांस उत्पादनासाठी



**सिरोही** - राजस्थान व पालमपूर (गुजरात)
रंग - तपकिरी व त्यावर गडद पट्टे
मांस उत्पादनासाठी प्रसिध्द
वजन नर - ५० किलो, मादी - ४० किलो
जन्मदर - वर्षात एक वेळा,
एक करडू देण्याचे प्रमाण जास्त

**ब्लॅक बेंगाल :** पश्चिम बंगाल
आखुड पाय, बुटकी शेळी, मांस उत्पादनासाठी प्रसिध्द, चामडी उद्योगात त्वचेला चांगली मागणी.
वजन नर २५-३० आणि मादि २०-२५ किलो.
रंग - काळा, नर व मादीला दाढी दिसते.
जन्मदर : जुळे व तिळे देण्याचे प्रमाण जास्त.



**बारबरी :**
गुजरात, उत्तर प्रदेश, राजस्थान या भागात आढळते
बुटकी शेळी, शहरातील शेळीपालनासाठी उपयुक्त
वजन नर ३०-३५ व मादी २५-३० किलो
रंग - पांढरा व अंगावर तपकिरी पट्टे व ठिपके
कान छोटे, उभे असतात.
नराला दाडी असते, मांस उत्पादनासाठी चांगली.



## शेळ्यांच्या विदेशी जाती :




बोअर जात(अफ्रिका)



अँग्लो नुबियन(इग्लंड)



सानेन (स्विर्त्झलँड)



अल्पाईन(अमेरीका)

## शेळ्यांचे जिवाणूजन्य आजार :



**१) आंतरविषार :** (क्लॉस्ट्रिडियम, परफ्रिन्जन्स डी) या रोगापासून संरक्षण करण्यासाठी पावसाळ्यापूर्वी लसीकरण करणे आवश्यक आहे. मातीतले जीवाणू कोवळ्या गवताबरोबर पोटात जाऊन, पोटात व आतड्यात विष: तयार करतात व याच विषामुळे शेळ्या/मेंढ्या तडकाफडकी मरतात. मरण्यापूर्वी शेळी/मेंढी हवेत उडी मारते, स्वत: भोवती चक्कर मारते, झटके येतात, तोंडाला फेस येतो, ताप येतो इत्यादी लक्षणे या आजारामध्ये आढळतात.

**२) फाशी (काळीपुळी) :** (बॅसिलस ॲन्थ्रॅसिस) हा रोग शेळ्यांना सुक्ष्म जीवाणूंपासून होतो. या आजारामध्ये शेळ्या तडकाफडकी मरण पावतात. मेल्यानंतर नाका तोंडातून व गुदद्वरातू रक्त येते व रक्त गोठत नाही. हा आजार संसर्गजन्य आजार आहे. मृत जनावरास खोल खड्ड्यात पुरून किंवा जाळून टाकावे व रोगाची लागण झाल्यास इतर शेळ्यांना लसीकरण करणे आवश्यक आहे.




**३) फऱ्या :** (क्लॉस्ट्रिडियम च्यावहाय)या आजारात शेळ्यांना ताप येतो. फऱ्याला सुज येते, शेळी लंगडू लागते. हाताने सुजेला दाबल्यास चरचर आवाज येतो. लस देणे फायद्याचे ठरते. पशुवैद्यकाच्या सहाय्याने उपचार करावेत.

**४) घटसर्प :** (पाश्चुरेला मल्टोशिडा) श्वसनसंस्थेचा शेळ्यातील हा प्रमुख आजार होय. शेळ्यांना या रोगाची लागन झाल्यास ताप येतो, घशाला सूज येते, लाल डोळे होतात. लवकर उपचार करणे फायद्याचे आहे. हा रोग शेळ्याच्या कळपात येवू नये म्हणून लसीकरण करणे आवश्यक असते.



**५) दगडी कास :** (जीवाणू, विषाणू, मायकोप्लाइझ्मा, बुरशी)जीवाणू कासात प्रवेश करून कास खराब करणारा हा घातक रोग शेळ्यांना खराब, अस्वच्छ गोठा असल्यामुळे जनलेल्या शेळ्यांना होतो. सडाच्या छिद्राद्वारे जीवाणू कासेत प्रवेश करतात. कास जड होते. गरम लागते, दुध खराब होते. कास मुकी म्हणजे दुध येणे बंद होते. पशुवैद्यकाच्या सल्ल्याने लवकर उपचार करावे.



**६. धनुर्वात :** (क्लॉस्ट्रडियम टीटॅनी) हा जीवाणूजन्य आजार आहे. शेळ्यांना या रोगाची लागन झाल्यास डोके बाजूला किंवा अंगाच्या वर ताट होते. अंगाला चिंचेच्या आकड्यासारखा बाक येतो, ताप वाढतो व दातखिळी बसते. श्वाशोच्छवास घेता येत नाही व शेळी लगेच दगावते.



## शेळ्यांचे विषाणूजन्य आजार :

**१) पीपीआर - शेळ्यांचा प्लेग :** (मोरबिली विषाणू) या आजारामध्ये ताप येतो, नाकात घाण येते, तोंडाला घान वास येतो, डोळे लाल होतात, तोंडात जखमा दिसतात, अतिसार लागतो, आंगातील पाण्याचे प्रमाण कमी होते व शेळी दगावते. लसीकरण करणे महत्त्वाचे.



**२) देवी/कांजण्या रोग :** (कॅप्रीपॉक्स विषाणू) तोंडाला, कासेवर, कानावर फोड येतात, डोळे लाल होतात लींफ नोड मोठे होतात. डोळ्यांना व नाकाला पाणी येते, ताप येतो, निमोनिया होतो. लसीकरण करणे फायद्याचे.



**३) लाळ्या खुरकत :** (पिकोरना विषाणू) जिभेवर, ओठावर व पायावर जखमा येतात, ताप येतो, शेळ्यांना खाता व पिता येत नाही त्यामुळे त्यांचा उपासमार होतो, तोंडाला लाळ येते व लंगडेपणा येतो. प्रतिबंधक उपाय म्हणून शेळ्यांना लसीकरण करावे.



**४) मावा :** मावा हा रोग विषाणूजन्य असून पारापॉक्स या विषाणूमुळे शेळ्यांना होतो. शेळ्यांना ओठावर सुज येऊन जखमा होतात.



लागण झालेल्या शेळ्या/मेंढ्यांना खातांना (चरतांना) त्रास होतो. पर्यायी शेळ्या अर्धपोटी राहून वजन कमी होते, कमी खाणे, ताप येणे इत्यादी लक्षणे आढळतात. हा आजार संसर्गजन्य असल्याने इतर शेळ्यांना प्रसारीत होऊ नये म्हणून आजारी शेळ्यांना इतरांपासून वेगळे करून त्यांच्यावर पशुवैद्यकाच्या सल्ल्याने उपचार करावे.

**५) फुफ्फुसदाह :** रोगग्रस्त शेळ्यांना सर्दी होते, श्वास घेण्यास त्रास होतो. ताप व खोकला येतो, अशक्तपणा वाढतो अशा शेळ्या कळपात मागे असतात. उपचार करतांना तज्ञ पशुवैद्यकाच्या सल्ल्याने प्रतिजैविकांची मात्रा ठरवावी. ताप, सर्दी कमी करणारे औषधी द्यावेत. अशा शेळ्या आजारी विभागात वेगळ्या ठेवाव्यात व थंडी, वारा यापासून त्या सुरक्षीत असाव्यात.



**६) सांसर्गीक आंतरसंस्था दाह** (मायकोप्लाझमा मायकॉइडस्) : या आजाराची लक्षणे प्रादुर्भाव झाल्यानंतर ६ दिवसांनी दिसतात. प्रथम उच्चताप येतो, त्यानंतर भुक मंदावते, नाकातून व डोळ्यातून पाणी येते. खोकला येतो, डोळे लाल होतात, पातळ पाण्यासारखी दुर्गंधीयुक्त जुलाब दिवसातून दहा ते बारा वेळा होतात, करडांना फक्त ताप व जुलाब आदि लक्षणे दिसतात. गाभण शेळ्या गाभडतात. पशुवैद्यकाच्या सहाय्याने उपचार व लसीकरण करून घ्यावे.



**७) गाभणकाळातील विषबाधा :** सुरूवातीच्या काळात कोणतेही लक्षणे जाणवत नाही, शेळी मान वरती करते, मागील दोन्ही पायांचा थरकाप होतो, जास्त दिवस झाल्यानंतर खाली मान घालून चालते, शेवटी आंधळ्याशेळीसारखी चालते व जमिनीवर पडते. गाभणकाळात समतोल व पौष्टीक आहार द्यावा. दोनशे ते तीनशे ग्रॅम रोज खुराक द्यावा. शेळ्यांना ताणविरहीत ठेवावे व पशुवैद्यकाच्या सल्ल्याने उपचार करावेत.



बुळकांडी, निलजिव्हा यासारखे विषाणूजन्य आजार शेळ्यामध्ये आढळतात. विषाणूजन्य आजार शेळ्यांना लसीकरण करून टाळता येतात.

## शेळ्यांचे लसीकरण :

शरीराची विशिष्ट रोगाविरूध्द प्रतिकार शक्ती वाढवण्याकरीता जी औषधी शरीरात दिली जाते तीला लस असे म्हणतात. या लस देण्याच्या पध्दतीला लसीकरण म्हणतात. जिवाणूजन्य व विषाणूजन्य आजार टाळण्यासाठी शेळ्यांचे लसीकरण करणे अतिशय आवश्यक आहे. लसीकरणामुळे शेळ्यांची रोगप्रतिकार शक्ती वाढते व त्या विशीष्ट लस दिलेल्या रोगांना बळी पडत नाहीत. लसीकरण खर्च अत्यल्प असून तो रोगी शेळ्यांच्या उपचार खर्चापेक्षा खुपच कमी असतो या मुळे शेळीपालकाचे आर्थिक नुकसान टाळता येते. लसीकरण करण्या अगोदर जंतनाशक औषधी वापरावी. लस निवडतांना उत्तम दर्जाची निवडावी. गाभण शेळ्यांना पशुवैद्यकाच्या सल्ल्यानेच लस द्यावी.



### लसीकरण करतांनाची काळजी :

१. लस नेहमी २ ते ८ अंश से. तापमानामध्ये ठेवावी.
२. प्रवासादरम्यान लस बर्फासोबत थर्मोस किंवा पिशवीत ठेवावी.
३. लसीकरण नेहमी सकाळी किंवा सायंकाळी करावेत.
४. लस मात्रा लहान, मोठे किंवा वजनदार जनावरांना सारखीच असते.
५. प्रत्येक जनावरांना निर्जंतुक केलेलीच किंवा नविन सुई वापरणे आवश्यक.
६. लस टोचण्याच्या ठिकाणी जनावरांना स्पिरीट किंवा आयोडिन लावू नये.
७. लस देण्याची वेळ अत्यंत काटेकोरपणे पाळणे आवश्यक असते.
८. गाभण शेळ्यांचे लसीकरण पशुवैद्यकाच्या सल्ल्याने करावे.
९. वातावरणातील उच्चबदलाच्या काळात जसे जास्त थंडी, ऊन व पाऊस यावेळी लसीकरण करू नये.
१०. लसीकरणापूर्वी एक आठवडा अगोदर शेळ्यांना जंतनाशक द्यावे.
११. आजारी शेळ्यांचे लसीकरण करू नये.
१२. शरीरावरती कोणताही ताण असल्यास लसीकरण करू नये.
१३. लसीकरण वेळापत्रकानुसार शेळ्यांना व करडांना त्यांच्या वयानूसारच करावे.

## लसीकरणाचे वेळापत्रक :

| रोग | पहिला डोस | नियमित डोस |
|---|---|---|
| आंतरविषार (इंटरोटॉक्सेमिया) | शेळी ४ महिने वयाची असतांना | दरवर्षी पावसाळ्यापूर्वी |
| | पिल्लाच्या आईला गाभण असतांना डोस दिला असल्यास, | पिल्लाचे वय ४ महिने असतांना |
| | डोस दिला नसल्यास | पिल्लाचे वय १ आठवडा असतांना व बुस्टर मात्रा १४ दिवसांनी परत द्यावी. |
| घटसर्प | शेळी ६ महिने वयाची असतांना | दरवर्षी पावसाळ्यापूर्वी |
| फऱ्या | शेळी ६ महिने वयाची असतांना | दरवर्षी पावसाळ्यापूर्वी |
| खुरकुत | शेळी ४ महिने वयाची असतांना | दरवर्षी उन्हाळ्यापूर्वी |
| देवी (पॉक्स) | शेळी ३ महिने वयाची असतांना | दरवर्षी डिसेंबर महिन्यात |
| सीसीपीपी | शेळी ३ महिने वयाची असतांना | दरवर्षी जानेवारी महिन्यात |
| पीपीआर | शेळी ४ महिने वयाची असतांना | दर ३ वर्षांनी |

## जंतनाशकाचे वेळापत्रक

| अ. क्र. | वय | नियमीत डोस |
|---|---|---|
| १ | ६ महिन्यापर्यंत | प्रत्येक महिन्यात एक वेळा |
| २ | ६-१२ महिन्यापर्यंत | प्रत्येक दोन महिन्यात एक वेळा |
| ३ | १२ महिन्यानंतर | वर्षामध्ये तीन वेळा(उन्हाळा,पावसाळा,हिवाळा) |





## शेळीपालनासाठी विविध शासनमान्य योजना :

१. पंतप्रधान रोजगार योजना (जिल्हा उद्योग केंद्र)

२. स्वर्णजयंती स्वयंरोजगार योजना (महाराष्ट्र शासन)

३. शेळीमेंढी पालन – एकात्मिक शेळी – मेंढी विकास योजना (नाबार्ड)

४. राष्ट्रीय कृषि विकास अंतर्गत योजना (महाराष्ट्र शासन)

५. जिल्हा पशुसंवर्धन विभागा अंतर्गत योजना (महाराष्ट्र शासन)

६. नाविन्यपुर्ण योजना (१०+१) (महाराष्ट्र शासन)

७. राष्ट्रीय पशुधन अभियान योजना (केंद्र शासन)

८. चारा व वैरण विकास योजना (महाराष्ट्र शासन)


९. कडबा कुट्टी यंत्र पुरवठा योजना (महाराष्ट्र शासन)

१०. मुरघास युनिट योजना (महाराष्ट्र शासन)


११. शेळीपालन करीता शेड बांधणी–मनरेगा अंतर्गत योजना (महाराष्ट्र शासन)

१२. मराठवाडा पॅकेज अंतर्गत शेळीपालन योजना (२०+१) (महाराष्ट्र शासन)

१३. नेपिअर चारा पिक ठोंब वाटप योजना (महाराष्ट्र शासन)























कृषि विज्ञान केंद्र



